... ग्र. सं. वाचनालय, ठा
विषय मा. ला.
दा. क्र. १५६८०

IRBK 0115970
IRBK-0115970

क्र. १५१५८
१४/३/०७

५३९३८
१६/३/०७
३६९४

# झुंजूमुंजू

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ८४९३८ वि. बालवाङ्मय
क्रमांक ३६९४ नोंद दि. १६.३.०७

लेखिका

सौ. तारा कुलकर्णी

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. १५१५८ नों. दि. १४/३/०७
वि. बाल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
योजना

IRBK-0115970

चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे १.


मुद्रक--
प्र. भा. काळे,
प्रतिभा मुद्रणालय, टिळक रस्ता, पुणे ९

किंमत १ रुपया

प्रकाशन ता. १४ जानेवारी १९६५

प्रकाशक--
सु. दे. जोशी व म. द. लोखंडे,
चिरंजीव ग्रंथ प्रकाशन,
टिळक रस्ता, पुणे ९

ग्रंथ र. . ालय, ठाणे. वाचनालय :




# झुंजू मुंजू झूऽझू

*

झुंजू मुंजू झू ऽ झू
बाळ म्हणतं घे ऽ घे
आई जाते पाण्याला
ये ग हम्मा गाई ऽऽ
हम्मा देते दू ऽ दू
वाटी चमचा चांदीचा
बाळ करतो तो तो
गोग्गो दिला चिऊला
बाळ घाली अंगा
बाळाची घेतली पापी
खळी पडते गालाला

पाळणा वाजे कू ऽ कू
काऊ चिऊ ये ऽ ये.
बाळ लागले रडायला
बाळाला दू दू देई ऽऽ
बाळ हसते खुदू खुदू
बाळ आमचा नवसाचा
आई देते गोग्गो
चिऊ देते पिलाला
करू नका दंगा
बाळ गेला झोपी
देव हसवी बाळाला !

★★★



# कूरकूर

✳

“ काय ग मनुताई
बोलत का ग नाहीस ?
काय झाले तुला ?
सांग तरी मला ! ”

“ काय सांगू ताई
अगं झोपी मूळी नाही
जराऽ लागला डोळा
तर निजमोड करतो मेला !

सांगते सारि कहाणी
उंदराची चावट करणी
काल ठेवलं बाळाचं नाव
म्हणून केले गुलाबजाम

जाळीखालचं पातेलं
श्रीखंडानं भरलेलं
खुडबुड झाली पातेल्यात
चटकन् धावून गेले आत

मट्मट् मिटक्या मारीत मेला
टुकूटुक् माकड करतो मला !
काय मेला उगाच त्रास
उंदीर खाल्ला, मोडला उपास !’

★ ★ ★


# लटक्या राजाची लटकी गोष्ट



अटकन् नगरीचा लटका राजा
आवडे त्याला गोड सांजा
नखभर तुपात कणभर रवा
त्यांत घातला गहूभर खवा
हजार पाचशे पान घोलवा
म्हणतो, 'सगळे पोऽटभर जेवा !'




लटक्या राजाची नकटी राणी
गळकं बोळकं भरते पाणी
पाणी भरले हंडे चार
म्हणते, ' आता दमले फाऽऽर !'



नकट्या राणीचं बुटकं पोर
नसता जीवाला होता घोर
फाटक्या टोपीचे तुटके कान
गुळाची ढेप उंटाची मान !



बुटक्या भावाची धाकटी बहीण
बेडकीच्या लग्नात होते विहीण
फेकट्या नाकाचा जावई छान
बोलतो तोतरा हलते मान !
अटकी लटकी गोष्ट सरो
हसता हसता पोट भरो !!



# गट्टी फूऽऽ

एक होती परी
तिला सापडली दोरी
दोरी होती लांब
जवळ होता खांब
खालती होतं तळं
वरती आभाळ निळं
परी होती हुशार
तिनं केला विचार
आभाळात जाऊ
भेटेल चंदा भाऊ
दोरी बांधली खांबाला
लागली वरवर चढायला
तुटली दोरी कच्‌कन्
परी पडली धप्पकन्
लागला चंदा हसायला
परी लागली रडायला
बसली पाण्यात लपून
चंदा पाही वाकून
परीची झाली 'फ'
चंदाशीं घेतली 'क'
आरागट्टी
वारागट्टी फूऽऽ!
वरती कधी यायचं नाही
चंद्राशी कध्धीऽऽ
बोलायचं नाही!



★ ★ ★



# बैलोबा

✳

आजोबा आमचे कसे कसे ?
काटेरी फणसात ' गरे ' जसे !

आजी आमची कशी कशी ?
दुधावर 'मऊ मऊ साय' जशी !

बाबा आमचे कसे कसे ?
' टम्म्ऽऽ दुध्या भोपळा ' जसे !
आई आमची कशी कशी ?
' साखरपाकाची वडी ' जशी !

ताई आमची कशी कशी ?
फटाक्याची ' लवंगी मिरची '
जशी !

दादा आमचा कसा कसा ?
फुकटचा रुबाब ' हिटलर '
जसा !

' शेरे देता ' मास्तर ' जसे
काय राव ! आपण कसे ? '
हे आण ते कर मी असा
फिरतो घाण्याचा बैल जसा !

* * *




# नदीला आला पूर

*

आभाळाच्या नदीला आला मोठा पूर
पुराचं पाणी जसा काळा काळा धूर.
ढगाचा हत्ती डुंबे पाण्यामध्ये छान
तिरका तिरका चालतो उंट करून वाकडी मान.
सोंड भरून पाण्यानं 'फुर्रर ऽऽ' करतो खाली
पाण्यानं भिजून झाली पृथ्वी चिंब ओली.
ढगा आडून चेष्टा करी सूर्य लपून छपून
टाळी देते वीज त्याला खदखदा हसून.
हिरवा हिरवा शालू भिजला फुले गळली खाली
'सगळे आमची चेष्टा करतात,
वाई कम्माल झाली!'

★★★



# बाळू जातो जत्रेला

*

ऐकलं कारे नंदू, सांगतो तुला गम्मत
बाळूची आहे एक जमाडी जम्मत !

गेला होता जत्रेला नवे कपडे घालून
धकाबुकीमध्ये गेला नवा सदरा फाटून.

देवळात गेला बाळू बूट ठेवले काढून
बाहेर येऊन पाहतो तर नेले कोणी उचलून.

रड रड रडला म्हणून फुगा घेऊन दिला
तोंडानं फुगवताना फटकन् फुटला.

* * * *

भिंगरी दिली घेऊन फिर फिर फिरली
वाऱ्यानं भूर्र्रदिशी उडूनच गेली.

रडू नको बाळू तुला मोटर हवी कारे ?
चावी देता तिची स्प्रिंगच मोडली किरे !

केळी खाल्ली सालं दिली रस्त्यात टाकून
घसरून पडला सटकन् लोटांगण घालून.

तहान लागली बिचाऱ्याला रस प्यायला गेला
रस आवडला खूप पण ग्लासच फुटला.

'यात्रा कशी झाली ?' म्हणतो, 'वा ! वा ! वा !'
फजीतीची गंमत काढता ओरडतो 'बा ऽऽ बा ऽऽऽ'


★★★



# ओळखा आमचा उखाणा


✳

डोक्यावर शेंडी झिळमिळती
अंगात कोट घालतो किती !
दात सगळे दुधाचे
वरती पाणी सोन्याचे
थंडी वाजते खूप खूप



अंग शेकी लावून तूप
उघडा बोके संन्यासी
बसतो सदा चुलीशी
ओळखा आमचा उखाणा
ओळखेल तो चतुर शहाणा !

★★★



# करंजी बसली रुसून

*

करंजी बसली रुसून
लाडोबा बोलले हसून
'काय झाले राणीला ?
सांग तरी मला !'
मुरका मारून बोलली
बाई कम्माल झाली
परवा दिवाळी आली
पण काळजी आहे का कसली ?
चकली चिवडा सांजोरी
करायला हवी पाकातली पुरी
माणशी अर्धा किलो साखर
पुरणार कशी ? सांगा तरी !
बाप तशी बेटी
तुमचीच लेक ती चिरोटी
तुम्हांला गूळ चालत नाही
तिला तर वाऽस खपत नाही
चिवड्याला नाही मुळी धाक
काजू-खोबऱ्याचाच खुराक

चकली सदा कुरकुरते
शंकर बाळा तसा शहाणा
कडबोळ्याचा पिळला कान
घरात चालतो सदा तंटा
कशी करावी दिवाळी साजरी
‘ जाऊ नको ’ म्हणता –
सांगून ठेवते आपल्याला बाई

लोण्यासाठी हट्टून बसते
सगळं चालतं करतो बहाणा
लागतो नाचायला टणाटणा
वाजते ‘नन्ना’ ची नकार घंटा
मी आपली जातेच माहेरी !
मग करू काय सांगा ?
तिखट-मिठाचे
चालणार नाही !

★★★



# युक्ती आली फळाला

*

एक होती आजी,
तिला आवडे मेथीची भाजी.
सुना होत्या चार, पण राग करीत फार !
आजीला काम होईना, खायला कोणी देईना.
आजीला नव्हतं दिसत, सारी तिला हसत.
पण आजी होती हुशार !
तिनं केला विचार.
काढली एक युक्ती, सगळ्यांची बसली मग आजीवर भक्ती
आजीनं केलं काय
घेतलं एक मडकं, त्याला बांधलं वरून फडकं
मडकं ठेवलं उशाशी, नातू लागत पाठीशी

" आजी आजी, सांग सांग, मडक्यात एवढं आहे काय? "
आणि मग
रात्री होई सामसूम, थांबे घरातली धामधूम
घड्याळ वाजे टण ऽ टण ऽऽ, मडकं बोले खण ऽ खण ऽऽ
घड्याळात वाजत बारा,
आजी मोजे, ' नऊ-दहा-अकरा '
सुना पहात गूपचूप, त्यांना वाटे
आजीजवळ पैसे खूप खूप ऽऽ!
युक्ती आली फळाला, सुना लागल्या सेवेला
मुलगे झाले राजी
आजी खाई आता रोज मेथीची भाजी
खूप खूप वर्षांनी काय झालं?
आजीची भरली शंभरी, आजी गेली देवाघरी
सुना लागल्या भांडायला, एकमेकींशी झोंबायला.
मोठी होती शिष्ट, मधली होती खाष्ट, नि धाकटी होती दुष्ट
एक सून हळूच पळाली, मडकं घेऊन वरती गेली
लागल्या सगळ्या धावायला नि मडक्याशी झोंबायला
उचलले मडके पटकन् निसटले हातून फट्कन्
दगड धोंडे विटा त्यात, मारीत बसल्या कपाळावर हात
युक्ती आली फळाला, आणि आजी गेली मोक्षाला!

★★★



# सर्कस

*

( तालगीत )

अललल् लललल् डुर्रर्र ऽऽऽ !
चला चला ! पळा पळा !
या बाळांनो या रे या
गावदेवीच्या मैदानावर सर्कस आली एक
सगळे मिळुनी नाचत जाऊ गंमत पाहू सुरेख
भला थोरला तंबू ठोकुनी
रंगिबिरंगी दिवे लावुनी
चित्रविचित्र पताका सजवुनी
'या, या !' म्हणतो शिंग फुंकुनी
विदुषक तिथला एक ! ॥ १ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम: ५४८३६ वि. ११०७१७३७४
क्रमांक: ३८९८ नोंद दि. २८।३।०७

चला दूर व्हा

टप् टप् टप् टप् घोडा येतो
गोल गोल तो रिंगण घेतो
घुंगरु बांधुनी पहा नाचतो
कमान करुनी कमाल करिती तेथील प्राणी अनेक ॥ २ ॥

ओ हो हो ऽऽ ! वा ! वा ! वा !

यावें यावें या गजराज
सुंदर जमला तुमचा साज
कशास धरीता उगाच लाज
दो पायांवर उभे राहुनी सलाम द्यावा एक ॥ ३ ॥

अरे बापरे–

अरे बापरे, हा तर आहे मृत्युगोलक !
ढुमुक् ढुम्मुक् वाजे ढोलक
उड्या मारिती तिथेच विदुषक
कसरत करिती चित्तथरारक
झुल्यावरचे काम पाहुनी टाळ्या पिटती लोक ! ॥ ४ ॥

घुर्ररर ! घुर्ररर ऽऽ !
अरे बापरे, हा तर वाघ
गुर्ररर ! गुर्ररर ऽऽ !

आपटीत शेपूट सिंह दाखवी उगाच धाक!
कडाड् कड्!
बसला चाबूक पाठीवर अन् चढला दोरीवर मग एक!
पऱ्या नाचती, मासे गिळती अद्‌भुत त्यांचा खेळ
सगळे मिळुनी नाचत जाऊ गंमत पाहू सुरेख! ।।५।।

गावदेवीच्या मैदानावर सर्कस आली एक
सगळे मिळुनी नाचत जाऊ गंमत पाहू सुरेख!

★ ★ ★





# मुळांची सफर

✳

टण् ऽ ! टण् ऽ ऽ ! टण् ऽ ऽ ऽ !
टण् ऽ ! टण् ऽ ऽ ! टण् ऽ ऽ ऽ !

सर्व मुले :——एक साथ नमस्ते !
एक साथ नमस्ते
घण् घण् घण् घण् घंटा झाली
शाळा सुटली सुट्टी झाली
चला चला ! उचला दप्तर पळा पळा !
चला गड्यांनो आपण आता खेळू चला
शाळेच्या त्या पटांगणावर जाऊ चला !

★ ★ ★ ★ 

एक मुलगा :—मी तर होइन गाडीवान
मोती पवळ्या बैलही छान
होऽऽऽऽ हो! हॅं, हॅं, हॅं! हुर्रर्र ऽऽऽ!
खुळ खुळ खुळ खुळ घुंगरु वाजती
वाऱ्यासंगे बैल धावती
हुर्रर्र ऽऽ! हो ऽऽऽ!

सर्व मुले :—गाडीवान दादा गाडी ने भरारा
गाडीवान दादा चला शेतामंदी घेऊनी चला
हो ऽऽऽ! हो, हो, होऽऽऽ!

दुसरा मुलगा :—पम् पम् पपम् पपम्
वाजे हॉर्न पों, पों, पों,
मोटर आली पपम् पपम्
फूर्रर्र ऽऽ! फुस्सस् ऽऽ!

सर्व :— रांगेमध्ये उभे राहुनी झटपट
तिकिटा काढू चला!
शाळेच्या त्या पटांगणावर जाऊ चला!

तिसरा मुलगा :—टप् टप् टप् टप् घोडा आला
मी तर होइन टांगेवाला
घेउन जाइन मी ठेसनला
सवारी काढा दो दो आना

सर्व:—चुकेल गाडी जलदी बैठो टाईम झाला
चला चला!
शाळेच्या त्या पटांगणावर जाऊ चला!

चौथा मुलगा :—झुक् झुक् झुक् झुक् कू ऽ ऽ ऽ !
कशासाठी पोटासाठी
खंडाळ्याच्या घाटासाठी
आली गाडी आली गाडी झुक् झुक् झुक्
गाडीने ती शिट्टी दिली कुक् कुक् कुक्
कूं ऽ ऽ ऽ ! फस् ऽ ऽ ऽ

एक— ए चाय् गरम चाय् गरम
बटाटेवडा नरम गरम


दुसरा :—एक एक आना गरम फळी
मिठा मिठा सस्ता केली

सर्व :—नका करू घाई गर्दी
सुमा अरू चढा वरती
हिरवे निशाण फडके आता खिडकीपाशी बसा चला !
शाळेच्या त्या पटांगणावर जाऊ चला !
भों ऽ ऽ ऽ ! भों ऽ ऽ ऽ !

सहावा मुलगा :— मचूल मचूल होडी चाले
डुलत डुलत नाव हाले
हैयारे हैया, हैया हैया
हैयारे हैया, हैया हैया
खुशीत समिंदर त्याला नाही धीर
हैयारे हैया, हैया हैया !

सर्व :— वल्हव वल्हव होडी दादा
रत्नागिरीला जाऊ रे चला
शाळेच्या त्या पटांगणावर जाऊ चला !

* * *



# चाऊ म्यॉऊ चले जाव

*

चाऊ ऽऽऽ ! म्यॉऊ ऽऽऽ !
चाऊ म्यॉऊ चले जाव

दोन तुकडे एक घाव
कशास करता गमजा राव
कळला बरका तुमचा डाव
चले जाव ! चले जाव ! चले जाव ! !
चाऊऽऽऽऽ ! म्यॉऽऽऊऽऽऽ !

ओलांडील जो लक्ष्मणरेषा
त्याचा उतरु पुरता नक्षा
शत्रुची करु चिमूट रक्षा
चले जाव ! चले जाव ! चले जाव ! !
च्याऊऽऽऽऽ ! म्यॉऊऽऽऽ !

वाघाचे अम्ही अहोत बच्चे
तसे दिलाचे मोठे सच्चे
डुसेल त्याला खाऊ कच्चे
चले जाव ! चले जाव ! चले जाव ! !
च्याऽऽऽव ! म्यॉऽऽऽव !

सैनिक अमुचे हिंमतवान
उडवू तुमची दाणादाण
गळेल तुमची फुसकी शान
चले जाव ! चले जाव ! चले जाव ! !
च्याऊ ऽऽऽऽ ! म्यॉऊऽऽऽ !

लावता लेको लाडीगोडी
कुठं मारता अता दडी
उडेल तुमची हवेलहंडी
सांभाळा अपुली शेंडी
चले जाव ! चले जाव ! चले जाव !
च्याऊ म्यॉऊ चले जाव !
च्याऊऽऽऽऽ ! म्यॉऽऽऽऊऽऽऽ !

[illegible] ठाणे. [illegible]
क्र. ९४९५० [illegible]
दि. [illegible]

# क्रिकेट मॅच

*


पारावरची सुटली शाळा
सगळे पक्षी झाले गोळा,
सुरू झाली क्रिकेट मॅच

कावळ्यानं घेतला बगळ्याचा
कॅच !

चिमणी झाली ' अंपायर '
' कॅप्टन ' होता कबुतर
राघू होता ' फास्ट बोलर '
चिमण्यानं रचला धावांचा डोंगर !

मारीत होता चौकार षट्कार
झळकले ' शतक ' बोर्डावर
' बकअप् प्लेअर ' ओरडला
मोत्या
पडली विकेट खाल्ला गोता !

सावध झाला ' विकेटकीपर '
गडबड करतो लेग स्पिनर
कॅप्टनचा उडाला त्रिफळा
संपला खेळ चला पळा !



# कोकीळ करिते कुहू

*

आटपाट नगरामध्ये होती राजाराणी
त्याचे नाव ‘ वसंत ’ तिचे नाव ‘ राणी ’
राणी होती काळी, पण गात असे छान
खूप आवडे वसंताला हरपे त्याचे भान !



एकदा झालं काय ?
राणी निघे बाजाराला जवळ आली होळी
आवडे त्यांना खूप खूप गोड गोड पुरणपोळी
रस्त्यात भेटे ‘ काकू ’ म्हणे, “ अरी भेटलीस,
बऱ्याच दिवसांत इकडं कुठं नाही ती दिसलीस ?

या उद्या आहे होळी दोघं जेवायला
जावईबापुंना येतील ' हे ' आमंत्रण द्यायला."
आली होळी, राणी उठली, केली वेणीफणी
तयार झाली नेसून साडी, ' आटप राजा म्हणी '

पण झालं काय ?

अजून काका आला नाही करून बसली थाट
आत्ता येईल मग येईल म्हणून पाही वाट.
आठ वाजले, नऊ वाजले, बारावरती गेला काटा
काका काही आला नाही भूक लागे पोटा
राजा म्हणे, ' भात टाक ! बहुदा ते विसरले–'
' भात खाऊन जेवणार काय तुम्ही मग तिथे ? '

राणी काही ऐकेना,

आत बाहेर घालून फेऱ्या राजा मुकाट झोपे
थकली राणी, ग्लानी आली तिथेच तीहि पडे
कधीच काका आला नाही आमंत्रण देण्याला
तडफड करीत गेली राणी प्राणपाखरु स्वर्गाला
वाट पाहे अजून येइल काका, काकू आज तरी
वने कोकिळा आंब्यावर करी कुहू कुहू ती करुणस्वरी
शहारतो मग मोहोर ऐकुनी स्वर तो ' येऊऽऽ, येऊऽऽऽ '
' वसंत आला ' म्हणतो आपण कोकिळ करिते कुहूँ कुहूँ !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
... ५७९३५ ... वि. बा।सावा।३-म५
३६९४ नोंद दि २१।३।७१

# थापाच थापा

*

एक होता अप्पू । एक होता गप्पू
अप्पू मारी थापा । गप्पू मारी गप्पा.
अप्पू म्हणतो काय ?
' उंदरानं खाल्ला मांजराचा पाय ! '
गप्पू सांगतो कसा ?




" आमच्या घरी मागच्या दारी
एकदा आली वाघाची फेरी
' मी ' घातली दूध-भाकरी
' हिनं ' बांधली गळ्यात दोरी
घातला चारा पाजले पाणी
असला चमत्कार केला का कोणी ? "

★ ★ ★ ★

अप्पू मारतो मग बंडल—
' एक होता मासा । त्यानं गिळला ससा
बसला त्याचा घसा । लागला खोकायला ठसा ठसा
दिला एक ठोसा । निसटला ससा
सश्यानं मारली चंद्रावर दडी
माश्यानं घेतली पाण्यात बुडी.'
' ॲऽऽऽ ! ' गप्पू म्हणतो, ' विशेष नाही.'
अरे—
आला एकदा यमाचा रेडा
गेला सामोरा आमचा घोडा
बघून यमाला म्हटले या ! या ! या !
घ्या घ्या यमाजी ' बिस्कुट चहा ! '

★ ★ ★






# मी झालोय आता मोठ्ठा!

*

बरं का ग आई, मी नाही छोट्टा
म्हणायचं नाही 'बाळ' मला
मी झालोय आत्ता मोठ्ठा!
बाबा गेले लढाईला, भाई गेला विमान चालवायला
घरात तर फक्त तुम्ही बायका
मग मला नको बघायला?
आणायचा नाही आता फुगा, नाही मागणार खाऊ
जुनाच शर्ट चालेल मला; नव्याचे पैसे लढाईला देऊ
परवा माझा वाढदिवस, अंगठी करु म्हणतेस
निधीला देऊन टाकू ती; काग अशी हसतेस?
थंडी वाजते खूऽप म्हणून स्वेटर करतेस मला?
खरं सांगू आई?

अग खरंच नको मला !
हिमालयावर बरं का आई, बर्फ पडते खूप खूप
'शूर जवानांना' दे की ग तुझ्या प्रेमाची उब !
कुशीत झोपेन तुझ्या मग थंडी पळेल पाऽऽर
स्वप्नांत जर चिनी आला तर करीन त्याला ठार !
का ग भरले डोळे ? मी का आहे छोटा !
तरी माझी 'पापी' घेतेस–
अग मी झालोय आता मोठा !

★ ★ ★



म. ग्रं. सं. ठाणे, बालसाहित्य शाखा
क्र. क्र. १५९६० नों. दि.
वि.



# स्फूर्ति-गीत

*


हुशार ! बालचमुंनो होशियार !
चला बंधुनो बालविरांनो रणांगणावर होशियाऽऽर !

भारत अमुचा देश महान्
त्याच्यासाठी लढवू प्राण
सर्वस्वाचे देउनी दान
फडकत ठेवू हिमाचलावर अविरत राष्ट्र निशाण ! ॥ १ ॥

उत्तर सीमा पहा दुभंगली
हिमगिरीला आस लागली
शौर्याची परी शर्थ जाहली
प्राणपणाने झुंज देती जे त्यांचा करु सन्मान ! ॥ २ ॥

आज असू जरी अम्ही शावक
परी सिंहाचे अहोत छावक
अभिमन्युही होता बालक
स्वतंत्र ‘ भू ’च्या रणवेदीवर खुशाल करु बलिदान ! ॥३॥
आक्रमकाला विक्रम दाऊ
खंडित भारत अखंड ठेवू
बिंदुबिंदुतुनी सिंधू उभवू
कोटी कोटी जनतेला हे करु आम्ही आव्हान ! ॥ ४ ॥
रक्तामधुनी देऊ शक्ती
वेदमुखातिल स्मरुनी उक्ती
शिवरायावर आमुची भक्ती
‘ को जागर्ति ’ म्हणून पुसता, ‘ अहम् ’ म्हणुनी
द्या ठणकावुनी करु नका अनमान ! ॥ ५ ॥
होशियार ! बालचमूंनो होशियाऽऽऽर !

★★★



IRBK-0115970

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ....
क्रमांक .... नोंद दि. ....

 ★ ★ ★ ★